# अशोकाचा धम्म

## अशोकाच्या धर्माविषयी विभिन्न मते

अशोकाच्या धर्माबद्दल विद्वानांमध्ये विविध मते आहेत. विभिन्न ऐतिहासिक साधनांवरून अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता हे स्पष्ट होते त्याच्या बभ्रु शिलालेखात तसा स्पष्ट उल्लेख आहे. विद्वानांत जे वाद आहेत ते त्याने ज्या धर्माचा प्रचार केला त्याबद्दल आहेत. डॉ मुखर्जीच्या मते "अशोकाचा व्यक्तिगत धर्म आणि त्याने ज्या धर्माचा प्रचार केला तो धर्म यातील अंतर स्पष्ट झाले पाहिजे. ज्या धर्माचा अशोकाने प्रसार केला तो निश्चितच बौद्ध धर्म नव्हे." डॉ. भांडारकर त्याच्या धर्माला निरपेक्ष बौद्ध धर्म मानतात तर डॉ स्मिथ म्हणतात की अशोक काही काळापुरता बौद्ध झाला होता. दीक्षितने त्याच्या धर्माचा संबंध ब्राह्मण धर्माशी जोडला आहे लामा तारानाथ त्याला तांत्रिक बौद्ध मानतात.

## अशोक बौद्ध होता है दर्शविणारे पुराने पुढीलप्रमाणे आहेत

१) बौद्ध ग्रंथ महावश व दीपवंशामध्ये त्याने बौद्ध धर्म स्वीकारल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.
२) बभ्रू आणि सांचीच्या शिलालेखात अशोकाने बुद्ध, धर्म व संघ या त्रिरत्नात स्वतःची आस्था प्रकट केली आहे.
३) त्याने इतर धर्मांच्या तीर्थस्थानांची यात्रा न करता केवळ बौद्ध तीर्थस्थानांची यात्रा केली.
४) चिनी यात्री ह्यूएनत्संग अशोक बौद्ध धर्मांचा अनुयायी असल्याचा निर्वाळ देतो.
५) सारनाथच्या शिलालेखात अशोकाने स्वत ला बौद्ध धर्माचा संरक्षक म्हटले आहे.
६) त्याने पशुबळी व मंत्र उच्चारणाला विरोध केला होता.
७) अशोकाने अनेक स्तूप व शिलालेख उभारले.
८) अशोकाने गौतम बुद्धाच्या विचारांना स्तूप व शिलालेखात स्थान दिले
९) अशोकाने पाटलीपुत्र येथे तृतीय बौद्ध धर्मपरिषदेचे आयोजन केले..
१०) बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी त्याने प्रचारकांना भारत व भारताबाहेर पाठविले

वरील विवेचनावरून अशोकाचा व्यक्तिगत धर्म हा बौद्ध धर्म होता याविषयी इतिहासकारांत दुमत नाही. परंतु त्याने प्रजेत ज्या स्थानिक धर्माचा प्रसार केला, तो बौद्ध धर्मापेक्षा जास्त व्यापक असून त्याची वैशिष्ट्ये विधातील सर्व धर्मात आढळून येतात.

## अशोकाच्या धर्माचे स्वरूप

अशोकाने त्याच्या अभिलेखांमध्ये ज्या धर्माचि विवेचन केले आहे तो एक कोणताही धर्म किंवा धार्मिक व्यवस्था नसून जाती व संप्रदायांच्या पलीकडील ती एक नैतिक जीवनाची आचरणशैली आहे. त्याच्या धर्माची दोन अंगे आहेत. १) व्यावहारिक २) तात्त्विक.

या धर्माची व्यावहारिक बाजू स्पष्ट करताना अशोकाने नागरिकांना असे जीवन जगण्याची प्रेरणा दिली की ज्यामुळे त्यांचे कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जीवन सुखी, सहिष्णू आणि उदार बनेल. विशाल साम्राज्यात शांतता, सुबत्ता आणि एकी टिकविण्यासाठी त्याला प्रजेच्या मनात वरील भावना निर्माण करणे आवश्यक वाटले.

या धर्माच्या सैद्धांतिक किंवा तात्त्विक बाजूचा विचार करताना त्याने अशा निरनिराळ्या तत्त्वांना किंवा सिद्धांतांना स्थान दिले की ज्यांचा संबंध त्याच्या व्यक्तिगत धर्माशी जोडता येतो. सारांश रूपाने असे म्हणता येईल की त्याने त्याच्या धर्मात सार्वजनिक जीवनाला विशेष स्थान दिले.

## अशोकाच्या धर्माची वैशिष्ट्ये

अशोकाने प्रजेत ज्या धर्माचा प्रसार केला तो बोजड तत्त्वज्ञानाने युक्त असा धर्म नव्हता. त्याचा धर्म असा धर्म होता की ज्यामुळे प्रजेचा मानसिक स्तर उंचावा. त्याच्या धर्मांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) सार्वभौमिकता

कुटुंब हा राष्ट्रातील सर्वात लहान घटक असल्याने कुटुंबातील सदस्यांप्रती असलेल्या प्रेम व सदभावनेला राष्ट्रप्रती समर्पित करण्यावर त्याने भर दिला. यासाठी त्याने प्रथम कुटुंबात सदभावना निर्माण व्हावी त्यानंतर समाजात व अंततः राष्ट्रात याचा आग्रह धरला. त्याच्या मते धम्मची सुरुवात कुटुंबापासून व्हावी. त्यासाठी आई-वडील, वडीलधारे, गुरूजन या सर्वांप्रती सर्वोच्च आदर बाळगायला हवा विद्यार्थ्यांनी गुरूजनांचा आदर करून त्यांच्या आज्ञेने पालन करायला हवे. गृहस्थाने त्याच्या दैनंदिन जीवनाच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांप्रती मानवी व्यवहार करायला हवा. यात ब्राह्मण, श्रमण, मित्र, परिचित, सेवक, निर्धन, धनवान आणि अशा व्यक्ती येतात की, ज्या

कोणत्या ना कोणत्या स्वरूपात त्याच्यावर अवलंबून असतात. ब्राह्मण आणि श्रमणांना उदारपणे दान द्यायला हवे. वयोवृद्धांप्रती आत्मीयता बाळगावी. इरागुडी अभिलेखात तो प्रजेला आवाहन करतो, माता-पिता, गुरूजनांचा आदर करा, सत्य बोला आणि सर्व सजीवांप्रती दयाभाव बाळगा.

२) **नैतिकता आणि चारित्र्य**

अशोकाने त्याच्या धर्मात नैतिकता आणि चारित्र्य यांना विभिन्न धार्मिक उत्सवांपेक्षा अधिक महत्त्व दिले आहे. आपल्या सातव्या शिलालेखात तो भावशुद्धीवर भर देतो तर बाराव्या शिलालेखात तो म्हणतो नैतिक आचरण व सच्चरित्र राहणे हेच मानवी जीवनातील खरे उत्सव आहेत. अकराव्या शिलालेखात तो आपल्या प्रजेला आध्यात्मिक दृष्टी प्रदान करतो व सर्व जीव-जंतूना प्राणदान देण्याचे आवाहन करतो. सहाव्या शिलालेखात तो अखिल मानवजातीच्या कल्याणाबाबत भाष्य करतो.

**३) सहिष्णुता**

विभिन्न संप्रदाय असलेल्या भारतात अशोक सहिष्णुतेक विशेष भर देतो. सहिष्णुतेची व्याख्या करताना तो म्हणतो याचे मूळ (तस्य तु इद मूलम) वाणीचा संचय (वचनुति) आहे. धार्मिक सहिष्णुतेचा प्रसार करण्यासाठी त्याच्या १२ व्या शिलालेखात म्हणतो की कोणाही व्यक्तीने स्वतः च्या धर्माची स्तुती व इतरांच्या धर्माची निंदा करू नये. स्वतः च्या धर्माबरोबरच इतरांचा धर्म जाणून घेण्याचाही प्रयत्न व्हायला हवा व त्या त्या धर्मातील चांगल्या गोष्टी स्वीकारायल्या हव्यात सर्व धर्मातील चांगल्या गोष्टी समजल्यावरच मनुष्य बहुश्रुत होतो. ज्ञानाची कक्षा वाढली की दृष्टीचीही कक्षा वाढते सहिष्णुतेमुळे विभिन्न संप्रदाय परस्परांच्या निकट (समवाय) येण्यास मदत होते. त्याने निरनिराळ्या जाती व पंथांत समन्वय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**४) अहिंसा**

विशाल साम्राज्यात शांतता, सद्भावना समन्वय आणि परस्पर प्रेम भावना निर्माण व्हावी म्हणून अशोक अहिसेवर विशेष भर देतो... म्हणूनच तो जीव-जंतूंनाही प्राणदान देण्याची भाषा बोलतो. अहिंसा तत्त्वाच्या पालनाची सुरुवात तो स्वतःपासून करतो. त्याच्या भोजनगृहात रोज कित्येक जिवांची हत्या होत असे तिथे आता केवळ एक हरीण आणि दोन मोरांची हत्या होऊ लागली. मांसाहाराकडून शाकाहाराकडे हा बदल एकाएकी होणे शक्य नाही याची त्याला जाणीव असल्याने तो ही पशुहत्या हळूहळू दूर करू इच्छितो म्हणूनच एकीकडे एक हरीण आणि दोन मोराची हत्येच्या गोष्ट बोलत असताना दुसरीकडे ही हत्याही भविष्यात पूर्णपणे समाप्त करण्याची भाषा तो बोलतो. त्याची अहिंसा भोजन आणि व्यक्तिगत जीवनापुरतीच मर्यादित नव्हती तर तो राजकारण व परराष्ट्र संबंधातही अहिंसाधोरणाचे जोरदार समर्थन करतो. त्याने युद्धधोरणाचा त्याग करून अहिंसात्मक राष्ट्रीय धोरणाचा स्वीकार केला. शिकारीसारख्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांना त्याने फाटा दिला. त्याच्या युद्धविजयाची जागा धम्म विजयाने घेतली. प्रेमाद्वारे प्रजेला नैतिक जीवन जगण्यास प्रेरित करने हे त्याने आपले जीवित कार्य ठरविले. लष्करी मोहिमाऐवजी त्याने आता शांतता अभियान सुरू केले. धार्मिकप्रसंगी पशुबळी प्रथेवर संपूर्ण बंदी घालण्यात आली.

**५) साधेपणा**

अशोकाने त्याच्या धर्माला अंधविश्वास व कर्मकांड यांचा स्पर्श न होऊ देता अतिशय सहजपणे व साधेपणाने प्रजेपुढे ठेवले. सर्वसामान्य बौद्धिक स्तर असलेल्या व्यक्तीलाही अगदी सहजपणे आपल्या धर्माचे पालन करता यावे यावर अशोकाचा विशेष भर होता. ब्राह्मण धर्मातील कर्मकांड आणि क्लिष्टता यामुळे त्याविरुद्ध निर्माण झालेल्या प्रतिक्रियांची अशोकाला संपूर्ण कल्पना असल्याने अशोकाने अविश्वास आणि कर्मकांडांची जाहीर निंदा केली त्याच्या मते धर्माचरण हेच मुळात पवित्र व मंगल असल्याने इतर बाह्यउपचारांची अजिबात गरज नाही. केवळ शारीरिक आनंदासाठी आयोजित करण्यात आलेल्या समारोहांचा तो विरोध करतो त्याने प्रजेच्या नैतिक आचरणावर व राजनीतीच्या आध्यात्मिकरणावर भर दिला. लोककल्याणावर भर देऊन त्याने प्रजेच्या सोयीसाठी वृक्ष लावले, विहिरी खोदल्या, दवाखाने उघडले, कैद्यांच्या सुखसोयींकडे लक्ष पुरविले.

अशोक हा कोणत्याही विशिष्ट धर्म किंवा पंथाचा पुरस्कर्ता नव्हता. त्याचा प्रजेसाठी असलेला धर्म हा सर्व धर्मांचे सार होता प्रशासकीय नियमांऐवजी नैतिकतेवर आधारित नियमांनी समाजात परिवर्तन घडून येऊ शकते ही त्यांची श्रद्धा होती. एका ठिकाणी तो म्हणतो, ‘‘धर्माचरण म्हणजे पापापासून दूर राहणे.’’ यावरून त्याचा धर्म म्हणजे नैतिक आचरणाचे नियम होत हे स्पष्ट होते. श्रीमती रोमिला थापर

म्हणतात "अशोकाचा धम्म म्हणजे जीवनाची अशी एक वाटचाल आहे की ज्यात पदोपदी आदर्श आचार-विचारांची साथ आहे. त्याच्या धम्मात अहिंसा जितकी महत्त्वाची आहे तितकेच महत्त्व मानवी संबंधांना दिले आहे.'

**धर्मप्रसार** –

अशोक आपला धर्म कुणावर लादू इच्छित नव्हता तर तो लोकांना धर्माकडे आकर्षित करू इच्छित होता. यासाठी त्याने पुढील उपाययोजना :-

१) सर्वप्रथम त्याने स्वतःच्या आचरणाद्वारे प्रजेपुढे एक आदर्श निर्माण केला त्याने त्याच्या धर्मानुरूप स्वतः च्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला त्याने पशुबळीवर बंदी घातली. स्वतः मांसाहाराचा त्याग केला व शिकार करणे सोडून दिले. मनोरंजनासाठी यात्रा काढणे बंद करून त्याऐवजी तो बौद्ध धर्माच्या पवित्र स्थळांना भेटी देऊ त्याच्या या आचरणाने प्रजा प्रभावीत होऊन तीही त्यांचे अनुकरण प्रयत्न करू लागली. त्याने युद्ध व हिंसा यांचा त्याग करून सर्व लक्ष लोककल्याणावर केंद्रित केले. सर्व धर्मियांप्रती त्याने सहिष्णू धोरणाचा अंगीकार केला.

२) धर्मप्रसारासाठी त्याने प्रशासनात आवश्यक ते बदल केले धर्म त्याच्या शासनाचा आधार बनला. तो पहिल्या स्तंभलेखात म्हणतो की, "धम्मद्वारा रक्षण करणे. धम्मानुसार शासन करणे, धम्मानुसार प्रजेला सुख देणे आणि धम्मानुसार साम्राज्याचे रक्षण करणे हेच माझे कर्तव्य आहे. कार्याबरोबरच धर्मप्रसार करण्यासही सांगितले. धर्मप्रसारासाठी त्याने धर्ममहामात्र नावाच्या " त्याने त्याच्या सर्व अधिकाऱ्यांना प्रशासनीय नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. त्यांचे कार्य प्रजेला धर्माची प्रेरणा देणे, धार्मिक सहिष्णुतेचा प्रसार करणे तसेच वृद्ध आणि अपंग यांची सेवा करणे हे होते राजुक, युक्त आणि प्रादेशिक या तिन्ही अधिकाऱ्यांनी मिळून दर पाच वर्षांनी साम्राज्याच्या प्रशासकीय आणि धार्मिक कार्याचा आढावा घ्यावा अशीही व्यवस्था त्याने केली.

३) धर्मप्रसारासाठी त्याने त्याचे धर्मासंबंधीचे विचार साम्राज्यभर निरनिराळ्या शिळांवर व स्तंभावर कोरले. त्याचे अधिकांश अभिलेख हे पाली भाषेत आहेत जी सर्वसामान्यांची भाषा होती. त्याच्या अभिलेखांची चर्चा याच प्रकरणात पूर्वी येऊन गेली आहे.

४) त्याने हिंसा भडकविणाऱ्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर साम्राज्यात बंदी घातली.उदा. प्राण्यांच्या झुंजी, त्याऐवजी त्याने धार्मिक उत्सवावर भर दिला.

५) अशोकाच्या काळात बौद्ध धर्मात काही मतभेद निर्माण झाल्याने ते दूर करण्यासाठी त्याने पाटलीपुत्र येथे तिसऱ्या बौद्ध धर्म संगीतीचे परिषदेचे आयोजन केले. मोग्गलीपुतिस्स या परिषदेचा अध्यक्ष होता. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी त्याने भारताबाहेर पश्चिम आशिया, पूर्व युरोप, इजिप्त इ. ठिकाणी धर्मप्रचारक पाठविले स्वतः या मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना त्याने श्रीलंका येथे धर्मप्रसारासाठी पाठविले.

अशोकाने धर्मप्रसारासाठी व्यापक प्रयत्न केले परंतु त्यात त्याला अपेक्षित यश मिळाले नाही. रोमिला थापर म्हणतात "ज्या समस्यांच्या निराकणासाठी अशोकाने या धर्माची स्थापना केली. त्या समस्या सोडविण्यास हा धर्म अयशस्वी ठरला. समाजात तणाव व सांप्रदायिकता कायम राहिली एका वाक्यात असे म्हणता येईल की, धर्माला समस्यांचे समाधान (उत्तर) मानणे चूक होते कारण समस्या या आमच्या व्यवस्थेच्या पाळामुळातच रुजल्या होत्या अशोकाला त्याच्या प्रयत्नात लक्षणीय यश मिळाले. नसले तरी त्याच्या उपक्रमाचे मोल कमी होत नाही प्रजेला त्याने धार्मिक सहिष्णुतेचा संदेश दिला व साम्राज्यात एकात्मता स्थापन करण्याचा प्रयत्न केला त्याचे हे कार्य निचितच प्रशंसनीय आहे.